संक्षिप्त

'सिनेमा कट्टा' वर आज 'ब्रिंक ऑफ लाइफ'

नाशिक : शहरातील विश्वास ग्रुप आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जलालपूर शाखेच्या वतीने चित्रपट प्रेमींसाठी 'सिनेमा कट्टा' उपक्रमांतर्गत शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता 'ब्रिंकि ऑफ लाइफ' हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन इंगमार बर्गमन यांचे आहे. चित्रपट डिझास्टर मॅनेजमेंट सेंटर ॲण्ड ट्रेनिंग हब (विश्वास गार्डन शेजारी), ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे दाखविण्यात येणार आहे. चित्रपट पाहण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वास ग्रुपचे प्रमुख विश्वास ठाकूर, विश्वास ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. मनोज शिंपी, रेडिओ विश्वासच्या समन्वयक ऋचिता ठाकूर यांनी केले आहे.

युनिव्हर्सल फाऊंडेशनतर्फे मार्गदर्शन

नाशिक: आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त युनिव्हर्सल फाऊंडेशनच्यावतीने महिलांच्या आरोग्यासाठी आयोजित विशेष प्रबोधन कार्यक्रमात डॉ. मोडक यांनी पीसीओडी व पीसीओएसची कारणे, लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी विद्यार्थिनींशी संवाद साधला. योग्य आहार आणि वेळेत उपचार घेतल्यास या समस्यांवर मात करणे सहज शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आरोग्य प्रश्नमंजुषा स्पर्धेत कृतिका शिंदेने प्रथम, तर निकिता बऱ्हेने द्वितीय क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक राम खैरनार, दीपक वडजे यांच्यासह डॉ. विशाल सोनकुळे, गिरीश कराड, सुनील बागूल उपस्थित होते. हर्षल खैरनार यांनी सूत्रसंचालन केले.

शेतकऱ्यांसाठी खासगी विधेयक

राजाभाऊ वाजे यांच्याकडून लोकसभेत सादर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

राजाभाऊ वाजे

नाशिक : शेतकऱ्यांच्या उत्पादनाला किमान लाभदायक दराची कायदेशीर हमी, बाजार भावातील घसरणीपासून आर्थिक संरक्षण, तसेच पीक काढल्यानंतर होणाऱ्या नुकसानीसाठी भरपाईची व्यवस्था आदींचा अंतर्भाव असणारे शेतकऱ्यांचा किफायतशीर किंमत प्राप्तीचा हक्क, खरेदी आणि जोखीम संरक्षण विधेयक २०२६ हे खासगी विधेयक नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी संसदेत सादर केले. या खासगी विधेयकात पिकांच्या उत्पादन खर्चाचा विचार करून लाभदायक दर (जीएमआरपी) निश्चित करणे आणि कायद्याची अंमलबजावणी, तपासणी व शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी दोन आयोग व संस्थांची स्थापना करण्याचाही अंतर्भाव आहे.

खासदार वाजेंनी मांडलेल्या या विधेयकाचा मुख्य आधार म्हणजे हमीदार किफायतशीर किमान किंमत (जीएमआरपी) ही संकल्पना. या अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या कृषी उत्पादनासाठी सरकारने निश्चित केलेल्या किमान लाभदायक दरापेक्षा कमी किंमत मिळू नये, असा कायदेशीर हक्क प्रदान करण्याचा प्रस्ताव आहे. आजपर्यंत किमान आधारभूत किंमत (एमएसपी) ही मुख्यतः धोरणात्मक घोषणा म्हणून अस्तित्वात आहे; मात्र या विधेयकाद्वारे ती कायदेशीर अंमलबजावणीसह बंधनकारक करण्याची मागणी करण्यात आली आहे. या विधेयकानुसार शेतकऱ्याला हमीभाव मिळण्यासाठी सरकारने दोन प्रमुख यंत्रणा लागू कराव्यात. सरकारी संस्थांमार्फत हमीभावाने थेट खरेदी, भावफरक भरपाई योजना, बाजारात शेतकऱ्याला हमीभावापेक्षा कमी भाव मिळाल्यास त्या फरकाची भरपाई १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे बंधनकारक करावे. त्यास विलंब झाल्यास सरकारने व्याजासह रक्कम द्यावी, अशी तरतूद करण्यात आली आहे.

शेतकरी संरक्षणासाठी विशेष निधी, त्यातून नुकसान भरपाई, बाजार स्थिरीकरण उपाययोजना व कृषी अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याचा प्रयत्न करता येईल. सरकारी संस्थांनी शेतकऱ्याचे उत्पादन जीआरएमपी दराने खरेदीचे बंधनकारक, बाजारभाव कमी असल्यास जीआरएमपी आणि बाजार भावातील फरक सरकार भरून देणार, जीएमआरपीपेक्षा कमी भावाने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर दंड आणि कारावासाची तरतूद, गावांच्या समूहासाठी खरेदी केंद्र, गोदाम आणि शीतगृह सुविधा. पिकांच्या उत्पादन खर्चाचा अभ्यास करून किमान लाभदायक दर निश्चित करणारा राष्ट्रीय आयोग, कायद्याची अंमलबजावणी पाहण्यासाठी संस्था, साठवणूक, हवामान किंवा बाजारातील संकटामुळे झालेल्या काढणीनंतरच्या नुकसानीसाठी आर्थिक संरक्षण आदींचा समावेश आहे. हे विधेयक केवळ किमान दराचा प्रश्न नाही, तर शेतकऱ्याच्या आर्थिक सन्मानाचा, उत्पन्नातील स्थैर्याचा आणि देशाच्या अन्नसुरक्षेच्या भक्कम पायाचा प्रश्न असल्याचे वाजे यांनी म्हटले आहे.

व्यापाऱ्याला कारावास

या विधेयकात व्यापाऱ्यांवर कठोर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. एखाद्या व्यापाऱ्याने शेतकऱ्याकडून जीएमआरपीपेक्षा कमी दराने उत्पादन खरेदी केले, तर ते बेकायदेशीर मानले जाईल. अशा प्रकरणात संबंधित व्यापाऱ्यावर मोठी दंडात्मक आणि सहा महिने कारावासापर्यंत शिक्षा अशा तरतुदी खासगी विधेयकात केल्या गेल्या आहेत. शेतकरी अनेकदा पीक काढल्यानंतरही मोठ्या संकटांना सामोरे जातो. साठवणूक, वाहतूक, हवामानातील अचानक बदल किंवा बाजारातील घसरण यामुळे उत्पादनाचे मोठे नुकसान होते. या समस्येचा विचार करून या विधेयकात काढणीनंतरच्या नुकसान भरपाईचा हक्क देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

अशोका हॉस्पिटलकडून अतिक्रमण

देवयानी फरांदे यांची विधानसभेत कारवाईची मागणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शहरातील अनधिकृत बांधकामे वाढत असून बहुचर्चित अशोका हॉस्पिटलने केलेल्या अतिक्रमणाचा मुद्दा भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनी विधानसभेत उपस्थित केला. कॅनॉल रोडला लागून असलेल्या विकास आराखड्यातील (डीपी) रस्त्यावरच संबधित हॉस्पिटलचे अतिक्रमण आहे. या बांधकामास परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच हॉस्पिटलचे अतिक्रमण काढण्याची मागणी करण्यात आली.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, महापालिका अतिक्रमण हटविण्याचे दावे करीत असली तरी प्रत्यक्षात वेगळीच स्थिती आहे. काही विशिष्ट भागात मोहीम राबविणारे प्रशासन अनेक भागांकडे दुर्लक्ष करते. आमदार फरांदे यांनी विधीमंडळ अधिवेशनात अतिक्रमणांचा विषय मांडला. इंदिरानगर भागातील ३० मीटर डीपी रोडला लागून २३ मीटर कॅनॉल रोड आहे. या ठिकाणी असलेल्या अशोका हॉस्पिटलने अतिक्रमण केल्याची तक्रार त्यांनी केली. तक्रार केल्यानंतर महापालिकेकडून फक्त हॉस्पिटलचे प्रवेशद्वार पाडण्यात आले. परंतु, रस्त्याची मोजणी केल्यानंतर २३ मीटरपैकी केवळ १६ मीटर जागा शिल्लक राहते. याचाच अर्थ उर्वरित जागेवर हॉस्पिटलने अतिक्रमण केल्याची बाब फरांदे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

विशेष म्हणजे नगररचना विभागानेच यास मान्यता दिल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, असा सवालही त्यांनी केला. शहरातील वाढत्या अतिक्रमणांना आळा घालण्यात महापालिकेची यंत्रणा अपयशी ठरली असून याबाबत नाराजी व्यक्त केली. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून मोठया प्रमाणात निधी देऊन विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. परंतु, अतिक्रमणांमुळे वाहतुकीला मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. महापालिकेकडून अतिक्रमण काढण्यासाठी खासगी कंत्राटदाराला काम देण्यात आले असले तरी एखाद्या ठिकाणी अतिक्रमण हटवल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पुन्हा अतिक्रमण होत असल्याने पैशांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असल्याचे त्यांनी सांगितले.

नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत अतिक्रमणांबाबत आयुक्तांना सूचना देऊनही ठोस कारवाई होत नसल्याबाबत फरांदे यांनी नाराजी व्यक्त केली. पथविक्रेता समितीची निवडणूक ऑगस्ट २०२४ रोजी झाली होती. त्यानंतर नाशिक महापालिकेने सहा महिने विलंबाने म्हणजे फेब्रुवारी २०२५ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठवला. एक वर्ष उलटूनही हा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याने पथविक्रेता समिती अद्याप अधिसूचित झालेली नाही. येत्या १५ दिवसांत पथविक्रेता समिती अधिसूचित होणार का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

समिती स्थापन होणार

मंत्री उदय सामंत यांनी आमदार फरांदे यांच्या प्रश्नांना उत्तर देताना पथविक्रेता समितीचा प्रस्ताव उपमुख्यमंत्र्यांकडे असून त्याला लवकरच मान्यता दिली जाईल, असे सांगितले. तसेच अशोका हॉस्पिटलप्रकरणी विभागीय आयुक्तांना चौकशीचे आदेश देण्यात येतील. दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले. अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका आयुक्तांसह पोलीस आयुक्त यांची समिती स्थापन करण्यात येणार असून या समितीमार्फत कारवाई करण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

एकतर्फी प्रेमातून युवतीवर हल्ला

संशयिताला पोलीस कोठडी

नाशिक : त्र्यंबकेश्वर शहराजवळ कामगाराच्या मुलीवर एकतर्फी प्रेमातून धारदार शस्त्राने वार करणाऱ्या संशयिताला त्र्यंबकेश्वर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यास न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

बुधवारी सकाळी घरात युवती एकटी असल्याचे पाहुन विशाल सकाळे याने तिच्यावर धारदार चाकुने सपासप वार केले. यावेळी युवतीने आरडाओरड केल्याने विशाल पळून गेला. शेजाऱ्यांनी अन्य नागरिकांच्या मदतीने जखमी तरूणीला जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तसेच त्र्यंबक पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी संशयित विशाल सकाळे यास गुरुवारी पहाटे अडीच वाजता अटक केली.

यासंदर्भात त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्याचे निरीक्षक महेश कुलकर्णी यांनी माहिती दिली. दोन ते तीन दिवसांपूर्वी मुलीच्या घरी जावून संशयित विशालने प्रेमाचे नाते जोडण्याची गळ घातली. हा प्रकार मुलीचा भाऊ आणि अन्य नातेवाईकांनी पाहिला. याबाबत विशाल याला त्याच्या आई वडिलांसमोर समज देण्यात आली. याचा राग मनात ठेवत बुधवारी पीडितेच्या घरी कोणी नसल्याचे पाहून तिच्यावर हल्ला करण्यात आला.

कोपरगाव-येवला-मनमाड रस्ता काँक्रिटीकरणास गती देण्याची सूचना

नाशिक : कोपरगाव- येवला-मनमाड(एनएच.१६० एच आणि एनएच.७५२ जी) चौपदरी काँक्रीट रस्त्यासह येवला वळण रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल लवकरात लवकर सादर करावा तसेच या ठिकाणी वळण रस्ता बांधणीच्या दृष्टीने कार्यवाही तातडीने सुरू करण्याची सूचना मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रालयातील बैठकीत दिली.

बैठकीस पंकज भुजबळ, समीर भुजबळ, येवल्याचे नगराध्यक्ष राजेंद्र लोणारी, येवला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती वसंत पवार, यांच्यासह अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे, दूरदृश्यप्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे राज्याचे प्रादेशिक अधिकारी अंशुमली श्रीवास्तव, एनएचएआय प्रकल्प संचालक श्रीकांत ढगे, नाशिक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रदीप शिंदे, छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहनचे विजय कोथळे, येवला उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, कार्यकारी अभियंता मुकेश ठाकूर, येवल्याचे मुख्याधिकारी तुषार आहेर आदी अधिकारी उपस्थित होते. मंत्री भुजबळ यांनी, कोपरगाव-येवला-मनमाड रस्त्याच्या चौपदरी काँक्रिटीकरणासह येवला वळण रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना भविष्यातील शहराचा वाढता विकास लक्षात घेऊन पर्यायी मार्ग निवडावा, असे सांगितले. त्यासाठीच्या आवश्यक यंत्रणांच्या मान्यतेची कार्यवाही तातडीने पूर्ण होईल, हे लक्षात घेऊन पर्यायी मार्गाचा विचार करावा. वळण रस्त्याची व्यापक उपयुक्तता लक्षात घेऊन भविष्याच्या दृष्टीने वळण रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल लवकर सादर करण्याचे मंत्री भुजबळ यांनी सूचित केले.

वंदे मातरममुळे क्रांतिकारकांना प्रेरणा

जयेश क्षेमकल्याणी यांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : वंदे मातरम या घोषवाक्यातून भारतीय स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा, जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यसंग्रामात लढणाऱ्या क्रांतीकारकांना मिळाली, त्याचमुळे आपण इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊ शकलो. असे प्रतिपादन विवेक विचार मंचाचे समन्वयक तथा उद्योजक जयेश क्षेमकल्याणी यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि गोखले एज्युकेशन संस्थेचे बिटको महाविद्यालय यांच्या सहकार्याने वंदे मातरम गीत निर्मितीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून क्षेमकल्याणी यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे वंदे मातरम उपक्रम समितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य, अध्यक्षस्थानी गोखले एज्युकेशन संस्थेचे विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी, प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे, पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य राहुल पाखरे आदी उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर, खुदीराम बोस यांच्यासह अनेक स्वातंत्र्यवीर आपल्या कुटुंबाचा त्याग करून देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाले.

या चळवळीमध्ये ३२ पेक्षा अधिक युवक फासावर चढले या सर्व युवकांच्या हृदयात वंदे मातरम या देशभक्तीपर गीताची प्रेरणा होती. आज आपण जे स्वातंत्र्याचे फलित बघत आहोत. त्याच्या पाठीमागे असंख्य युवक, असंख्य स्वातंत्र्यवीर लढले. आणि आपल्या मातृभूमीसाठी शहीद झाले. या सर्वांचे कृतज्ञ स्मरण आजच्या वंदे मातरम या शतकोत्तरी अजरामर ठरलेल्या गीताने करूया, असे क्षेमकल्याणी यांनी सांगितले.

डॉ. राम कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये राष्ट्रभक्तीचे मूल्य रुजवावे, असे आवाहन केले. उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिलकुमार पठारे यांनी वंदे मातरम या शब्दाभोवती असलेले क्रांतीचे वलय तसेच या काव्याला असलेला अजरामर इतिहास सांगितला.

निडो होम फायनान्स लिमिटेड

(आधी एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) (निडो), नोंदणीकृत कार्यालय टॉवर ३, ५वा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०००७० येथे आहे. प्रादेशिक कार्यालय येथे आहे: कार्यालय क्र. ४०७-४१०, ४था मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१६.

सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, खालील कर्जदारांनी निडो यांच्याकडून मिळवलेल्या कर्ज सुविधांचे मुद्दल आणि व्याज परतफेड करण्यात कसूर केली आहे आणि सदर कर्ज खाती नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना बजावण्यात आली होती. सदर मागणी सूचना व्यतिरिक्त, त्यांना सदर या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात आले आहे.

कर्जदारांचे तपशील, सिक्युरिटीज, थकबाकी, कलम १३(२) अंतर्गत पाठवलेली मागणी सूचना आणि त्याअंतर्गत दावा केलेली रक्कम खालीलप्रमाणे दिली आहे:

१. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदाराचे नाव आणि पत्ता आणि कर्जाची रक्कम :

१. प्रथमेश किरणचंद्र @ किरण गुप्ते (कर्जदार) २. नम्रता अमित सूर्यवंशी (सह-कर्जदार) बंगला क्र. २७, यशोमंदिर को-ऑप हाऊसिंग सोसायटी, दत्त मंदिराजवळ, काठे गल्ली, आर.जे.ई.एम. शाळेच्या मागे, द्वारका नाशिक ४२२०११ **येथे देखील :-** बी-५/२०१, तलब कंपनीजवळ, मु-कोंढवा बुद्रुक, निम्ब ता. हवेली, पुणे शहर, पुणे- ४११०४८.

एलएएन क्र.: एलएनएसकेएलएपी०००००५२६८९/ एलएनएसकेएलएपी०००००८४३६४ कर्ज करार तारीख: १९.०७.२०१८ आणि ११.१२.२०२०

एकूण रक्कम : रु. ७९,५३,३७५/- (रुपये एकोणऐंशी लाख त्रेपन्न हजार तीनशे पंचाहत्तर फक्त) आणि **रु. ७,६०,९१८/-** (रुपये सात लाख साठ हजार नऊशे अठरा फक्त) एकूण एकत्रित रु. ८७,१४,२९३/- (रुपये सत्त्याऐंशी लाख चौदा हजार दोनशे त्र्याण्णव फक्त)

एनपीए तारीख: ०६.०३.२०२६ मागणी सूचना तारीख:- ०७.०३.२०२६

देय थकबाकी रक्कम रु. १,०२,८३,६८६.९३/- (रुपये एक कोटी दोन लाख त्र्याऐंशी हजार सहाशे शहाऐंशी आणि त्र्याण्णव पैसे फक्त) आणि **रु. १,६३,९२५.३२/-** (रुपये एक लाख त्रेसष्ट हजार नऊशे पंचवीस आणि बत्तीस पैसे फक्त) एकूण एकत्रित **रु. १,०४,४७,६१२.२५/-** (रुपये एक कोटी चार लाख सत्तेचाळीस हजार सहाशे बारा आणि पंचवीस पैसे फक्त) **दि. ०५.०३.२०२६** रोजीनुसार देय आणि थकित.

मालमत्तेचे परिशिष्ट :- प्लॉट क्र. २७ यावर बांधलेला धारण बंगला क्षेत्रफळ मोजमापे सर्वे क्र. ४३३ असलेले यशोमंदिर सहकारी गृहनिर्माण संस्थेत ३९६.१३ चौरस मीटर संपूर्ण बांधकामासह रंगुबाई जुबरे हायस्कूलजवळ, काठे लेन, द्वारका नाशिक नाशिक महानगरपालिका ४२२०११ च्या हद्दीमधील यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.

म्हणून, तुम्ही वरील कर्जदारांना सदर या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत वर नमूद केलेल्या थकबाकीची संपूर्ण रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे, अन्यथा निम्नस्वाक्षरीकार यांना वरील नमूद केलेल्या सिक्युरिटीजची अंमलबजावणी करण्यासाठी सरफेसी कायद्यांतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल. कृपया लक्षात ठेवा की, सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३(१३) यानुसार, तुम्हाला आमच्या संमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे वर नमूद केलेल्या सिक्युरिटीज हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

ठिकाण: नाशिक
दिनांक: १३.०३.२०२६

सही/- अधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड यांच्यासाठी
(आधी एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

निडो होम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची एडेलवाईज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) (निडो), नोंदणीकृत कार्यालय: टॉवर ३, पाचवा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोळ रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७० क्षेत्रीय कार्यालय: ऑफिस क्र. ४०७-४१०, चौथा मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस क्र. २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१६.

सर्फेसी अधिनियम, २००२ मधील अनुच्छेद १३(२) अंतर्गत मागणी सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की पुढील कर्जदारांनी निडो यांचेकडून प्राप्त केलेल्या कर्ज सुविधांच्या मुद्दल व व्याजाच्या परतफेडीमध्ये कसूर केली असून सदर कर्ज खाती अनुत्पादक मत्ता (एनपीए) म्हणून वर्ग करण्यात आलेली आहेत. त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ (सर्फेसी अधिनियम) च्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत मागणी सूचना पाठविण्यात आली होती. सदर मागणी सूचनेच्या व्यतिरिक्त त्यांना सदर जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येत आहे.

कर्जदार, अनामती, थकबाकी रक्कम, अनुच्छेद १३(२) अंतर्गत पाठविण्यात आलेली मागणी सूचना आणि त्यात मागणी केलेली रक्कम इ.चा तपशील खालीलप्रमाणे आहेः

१. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदाराचे नाव आणि कर्ज रक्कमः

१. श्रीवास्तव डेटल क्लिनिक (कर्जदार), २. कीर्ती अमरीशचंद श्रीवास्तव (सह-कर्जदार), ३. अमरीशचंद श्रीवास्तव (सह-कर्जदार), सर्वांचा निवासी पत्ताः दुकान क्र. एल३, प्लॉट क्र. २१८, खालचा तळ मजला (बेसमेंट मजला), सुयोजित मॉडर्न पॉईंट, शरणपूर रोड, पोलीस ग्राउंडजवळ, भारत पेट्रोलियमसमोर, नाशिक ४२२००१. सर्व येथेसुद्धाः १. सदनिका क्र. ७०४, तिरुमला रिजेन्सी, शर्मा मंगल कार्यालयासमोर, दीपाली नगर, सिडको, नाशिक- ४२२००९. २. श्रीवास्तव डेटल क्लिनिक, दुकान क्र.०५, एक्सप्रेस टॉवर, रेणुका नगर, वडाळा नाका, नाशिक -४२२००१.

कर्ज खाते क्र.: L087SBIST000005338790 कर्ज करार दिनांकः ०४-०२-२०२६

कर्ज रक्कमः रु. ३२,००,०००/- (रुपये बत्तीस लक्ष फक्त). **एनपीए दिनांकः** ०४-०२-२०२६.

मागणी सूचना दिनांकः १६-०२-२०२६.

थकबाकी रक्कमः १५-०२-२०२६ रोजीनुसार देय रक्कम रु ३२,९७,०८४.२९ (रुपये बत्तीस लक्ष सत्त्याण्णव हजार चौऱ्याऐंशी आणि एकोणतीस पैसे फक्त).

मालमत्तेची अनुसूचीः दुकान क्र. एल३, खालचा तळ मजला (बेसमेंट मजला), क्षेत्रफळ सुमारे २७० चौ.फू. (२५ चौ.मी.), प्लॉट क्र. २१८, सुयोजित मॉडर्न पॉइंट, शरणपूर रोड, पोलीस ग्राउंडजवळ, भारत पेट्रोलियमसमोर, नाशिक - ४२२००१. **सदर मालमत्तेच्या चतुःसीमाः पूर्वेस** - सामायिक पॅसेज, **पश्चिमेस** - दुकान क्र. एल-१४, **दक्षिणेस** - दुकान क्र. एल-४, **उत्तरेस** - दुकान क्र. एल-१.

त्यामुळे आपण म्हणजे वर नमूद कर्जदारांना सदर सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत वर नमूद करण्यात आलेल्या संपूर्ण थकबाकी रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात येत असून तसे न केल्यास निम्नस्वाक्षरीकारांना नाईलाजाने वर नमूद अनामतीवर कारवाई करण्यासाठी सर्फेसी अधिनियमांतर्गत पावले उचलावी लागतील. कृपया लक्षात घ्यावे की सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(१३) नुसार आपल्याला आमच्या संमतीविना वर नमूद अनामतीची विक्री करणे, ती भाडेपट्टीने देणे किंवा तिच्या संदर्भात इतर कोणताही व्यवहार करण्यास मज्जाव करण्यात येत आहे.

स्थानः नाशिक
दिनांकः १३.०३.२०२६

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड करिता (पूर्वीची एडेलवाईज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

ई-लिलाव विक्री सूचना

एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

सीआयएनः यू६७१००एमएच२००७पीएलसी१७४७५९
रिटेल सेंट्रल आणि नोंदणीकृत कार्यालय : एडेलवाईस हाऊस, सीएसटी रोडच्याबाहेर, कलिना, मुंबई ४०००९८

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२च्या नियम ८ (६) आणि ९ (१) ची तरतुद सहवाचता ("नियम") सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

येथे नमूद केलेल्या असाइनरच्या आर्थिक सुविधा (यापुढे ("असाइनर/मूळ कर्जदाता" म्हणून संदर्भित) एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड यांना देण्यात आल्या आहेत, ज्याने दिलेल्या कॉलममध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या विविध ट्रस्टच्या विश्वस्त म्हणून काम केले आहे. उल्लेखित असाइनरनुसार, ईएआरसी यांनी असाइनरची भूमिका घेतली आणि सुरक्षित धनको म्हणून त्याचे अधिकार वापरले. ते ईएआरसी, सुरक्षित धनको म्हणून त्याच्या क्षमतेनुसार, यांनी सरफेसी कायदा आणि त्याअंतर्गत नियमांच्या कलम १३(४) अंतर्गत खाली नमूद केलेल्या स्थावर सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला होता.

१५ दिवसांची सूचना सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना देण्यात येत आहे की, सुरक्षित धनको यांच्या नावे गहाण ठेवलेली खाली वर्णन केलेली स्थावर सुरक्षित मालमत्ता, ज्याचा भौतिक ताबा सुरक्षित धनको यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने (एओ) घेतला आहे, ईएआरसी यांच्यामुळे खाली नमूद केलेल्या रकमेच्या वसूलीसाठी, कर्जदार आणि जामीनदाराकडून ईएआरसी यांना मिळालेल्या कोणत्याही पैशासाठी वजा केलेल्या पुढील व्याज आणि इतर खर्च/मूल्य यासहित, **"जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, तसे आहे" आणि "तिथे जे काही आहे"** या तत्त्वावर विकली जाईल. प्रत्येक मालमत्तेसाठी आरक्षित किंमत आणि इसारा ठेव अनामत खाली नमूद केले आहे.

लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचे तपशीलः

अ. क्र.	कर्ज खाते क्र./ विक्री करणारी संस्था	कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराचे नाव	ट्रस्टचे नाव	एकूण थकबाकी भारतीय रुपयांमध्ये	आरक्षित किंमत भारतीय रुपयात	इसारा ठेव अनामत (ईएमडी) भारतीय रुपयात	लिलावाची तारीख आणि वेळ	ताबा प्रकार
१	१४१३४००९/ आयडीएफसी बँक लि.	१. श्री जगदीश वसंत संन्यासी (कर्जदार) २. श्रीमती प्रियांका जगदीश संन्यासी (सह-कर्जदार)	ईएआरसी ट्रस्ट एससी ४६८	रु ३९,७६,७६१.३९/- दि. ०६.०१.२०२६ रोजीनुसार	रु २५,००,०००/-	रु. २,५०,०००/-	दि. ३०.०३.२०२६ रोजी सकाळी ११.३० वा.	भौतिक

मालमत्तेचे वर्णन : असलेली मालमत्ता फ्लॅट क्र. ७, मोजमापे ७१.९३ चौ. मीटर म्हणजेच ७७४.०० चौ. फूट एकदंत हाइट्सच्या चौथ्या मजल्यावर बांधलेले, सीटीएस क्र. - एस४०२, ५४०२-अ, ५४०२-ब, पंचवटी नाशिक, महाराष्ट्र - ४२२००३ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, उत्तरः भुईवाडा, दक्षिणः अन्नपूर्णा भवन, पूर्वः प्लॉट क्र. ८ आणि पश्चिमः आकार अपार्टमेंट आणि ४.५ मीटर रस्ता.

२	१८७०६०००० १८३	श्री. चेतन आनंद भारती ("कर्जदार"), श्रीमती अपेक्षा चेतन भारती ("सह-कर्जदार")	ईएआरसी ट्रस्ट एससी-४७८	रु. १४,१६,३६१.५५ दि. ११.०३.२०२६ रोजीनुसार	रु ६,५०,०००/-	रु. ६५,०००/-	दि. ३०.०३.२०२६ रोजी दुपारी २.३० वाजता	भौतिक

मालमत्तेचे वर्णनः फ्लॅट क्र. १२ मोजमापे ३५.१३ चौ. फूट बिल्ट-अप एरिया म्हणजेच १९.३९ चौ. मीटर कार्पेट एरिया, स्टिल्ट दुसऱ्या मजल्यावर, 'अनु आरती हाइट्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्लॉट क्र. १४ मोजमापे ५३२ चौ.